**नि.फौ.ख.क्र.१०/२०२२**
**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १**
**निशाणी क्र.२१**

शपथेवर कथन करतो की,

**नांव** – श्री. सुरेश नारायण भोसले
**वय** – ५४ वर्षे, **धंदा** – शेती
**राहणार** – म्हाळुंगे, ता.महाबळेश्वर, जि.सातारा

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती.जे.आर.इंगळे</u>**

१. दि.३०.०६.२०२१ रोजी वनरक्षक गायकवाड व वनपाल जोशी साहेब यांनी मला आडोशी येथे वन विभागाची संरक्षण कुटी येथे बोलावले होते. त्याठिकाणी संरक्षण कुटीचे नुकसान झाले होते. मी त्यांच्याबरोबर त्याठिकाणी गेलो होतो. मी त्यावेळी वनविभागामध्ये वनमजुर म्हणून कामास होतो. त्यावेळी मी आरव बीट येथे कामाला होतो. मला त्याठिकाणी वनरक्षक व वनपाल घेवून गेले होते. त्याठिकाणी पोलीस गायकवाड हेदेखील हजर होते. दुसरे पंच त्यावेळी राम किंवा रामचंद्र कदम हे हजर होते. कुटीला १० बाय १० च्या दोन रुम होत्या व त्यातच संडास बाथरुम होते. मी गेलो तेव्हा स्लायडींग फोडलेल्या होत्या. तसेच, टेबल खुर्ची तुटलेली आढळून आली. आत रुममध्ये सोलरची लाईट सिस्टीम होती ती तोडलेली होती. वायरलेस तोडलेले होते. तसेच, इनव्हर्टर तोडलेला होता. त्याठिकाणाहून ७–८ बल, सोलर बॅटरी चोरीला गेले होते असे वनरक्षकांनी सांगितले होते. बॅटरी कोणत्या कंपनीची होती ते मला आठवत नाही. तेथून आम्ही सिंधी नदीच्याठिकाणी गेलो. त्याठिकाणी वनखात्याची होडी होती. ती तोडून जाळलेली आढळलेली. त्या होडीचा पाठीमागचा भाग तोडलेला होता व जाळलेला होता. त्याठिकाणी आमचे पाण्याचे इंजिन किंवा मोटार होते. ते किर्लोस्कर कंपनीचे होते. त्याची तोडफोड करण्यात आली होती. त्या इंजिनाला २.५ इंचाचा गोलटा पाईप जोडलेला होता. तो चार ठिकाणी तोडलेला दिसला. ते सर्व पाहून पोलीसांनी पंचनामा बनवला व त्यावर साक्षीदार म्हणून माझी सही घेतली. तो पंचनामा

मी वाचून सही केली. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर अ.क्र.१ वर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदरील **घटनास्थळ पंचनाम्यास निशाणी क्र.२२** देण्यात येत आहे. पंचनामा ०४:५५ वाजता सुरु केला व ०६:०५ वाजता संपला.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपीतर्फे विधीज्ञ कु.ए.के.शेटे यांचेमार्फत उलटतपास सुरु**

२. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावर काय घटना घडली त्याची मला वैयक्तिक माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटना घडण्यापूर्वी माझी वन मजूर म्हणून आडोशी येथे अनेकवेळा डयुटी होती. हे म्हणणे खरे आहे की, आडोशी येथे डयुटी असल्यामुळे माझे घटनास्थळावर येणे जाणे असायचे. हे म्हणणे खरे आहे की, माझे नेहमी जाणे येणे असल्यामुळे घटनास्थळावर काय काय आहे याबाबत मला माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिक गायकवाड व जोशी हे माझे वरिष्ठ अधिकारी आहेत. गायकवाड पोलीसांनी मला पंचनामा करण्याबाबत लेखी आदेश दिलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा पोलीसांनी तयार केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी त्यावर माझ्या सह्या घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिक गायकवाड व संदीप जोशी हे माझे वरिष्ठ असल्यामुळे मी त्यांच्या सांगण्यानुसार खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दुसरे पंच रामचंद्र कदम हे घटनास्थळावर माझ्यासोबत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितलेले सर्व खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Sd/-

ठिकाण : मेढा
रविंद्र भ.खवले,

दि.२२.०५.२०२३
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मेढा.**